# भारतीय परराष्ट्र धोरणाची मोदी-नीती (२०१४-२०१९)

संशोधक विद्यार्थी
**संतोष उमाकांत गुरव**
**राज्यशास्त्र**
स्कुल ऑफ सोशियल सायन्सेस,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
मो. नं. ९८९०२४७२१७

संशोधन मार्गदर्शक
प्रा.**डॉ. विश्वनाथ महादेव आवड**
**राज्यशास्त्र विभागप्रमुख**
शंकरराव मोहिते
महाविद्यालय, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

● **सारांश (Abstract):**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाला एक निश्चित चेहरा प्राप्त करून दिला आहे. दक्षिण आशियात एक विश्वास निर्माण केला आहे. चीनची लहान देशांना वाटणारी भीती आणि त्या भीतीपोटी चीनच्या अटी मान्य करण्याची अगतिकता यातून त्या देशांची मोदी यांच्या सहकार्य-सहमती-संवाद या धोरणाने सुटका होत आहे. स्वप्नाळू पंचशील ते क्रियाशील पंचसूत्री असा परराष्ट्र धोरणाचा प्रवास २०१४ ते २०१९ या दरम्यान झाला आहे. "राष्ट्र प्रथम" अश्या मूलभूत भूमिकेतून आंतरराष्ट्रीय समुदायाशी प्रस्थापित होणारे संबंध प्रभावी ठरत आहेत. परदेशी भारतीयांना नरेंद्र मोदी यांनी घातलेल्या सादेला मिळणारा प्रतिसाद उस्फुर्त आहे. डावपेच आणि धोरण अश्या दुहेरी तंत्राचा वापर होत आहे. मध्य पूर्वेतील देश भारताबरोबर मैत्री करण्यासाठी उत्सुक आहेत. आखाती देशात वंदे मातरमचे सूर उमटणे, तेथे मंदिर निर्मिती

होणे आणि योग दिन आंतरराष्ट्रीयस्तरावर साजरा होण्यास सुरुवात होणे अशी अनेक उदाहरणे मोदी नीतीची झलक आहे.

**● प्रस्तावना (Introduction):**

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मॅरॉथॉन परदेश दौरे, जागतिक नेत्यांशी त्यांनी जोडलेले व्यक्तिगत नातेसंबंध, त्यामुळे भारताच्या या देशांशी असलेल्या संबंधांमध्ये झालेली भरीव सुधारणा, परराष्ट्र धोरणात देशाची सुरक्षा, संस्कृती आणि समृद्धीला दिलेले प्राधान्य, शेजारी राष्ट्रांना दिलेलं प्राधान्य, त्याच बरोबर देशातील राज्यांना दिलेलं महत्त्व, प्रवासी भारतीयांशी साधलेला संवाद आणि त्यांच्या पुढच्या पिढीला भारताचे सदिच्छा दूत म्हणून पाठबळ देण्याचे झालेले आग्रही प्रयत्न, भारताची प्रतिमा उंचावण्यासाठी इंटरनेट आणि समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर या सगळ्यांच्या एकत्रिकीकरणातून परराष्ट्र धोरणाची मोदी-नीती समोर येते.

**● मूळशब्द (Keywords):**

भारत, परराष्ट्र धोरण, मोदी-नीती, आर्थिक विकास,

**● संशोधनाची उद्दिष्ये (Objectives of the Research):**

१) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या (२०१४-२०१९) या कालखंडातील परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या (२०१४-२०१९) या कालखंडातील परराष्ट्र धोरणाचे चिकित्सक मूल्यमापन करणे.

● **संशोधनाची गृहीतके (Hypothesis of the Research):**

१) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण तत्त्विकतेपेक्षा वास्तवावर भर देणारे असे आहे.

२) २१ व्या शतकात भारत त्या मोजक्या फ्रंटलाईन राष्ट्रांपैकी एक असेल जे जगाचं नेतृत्त्व करतील.

३) पंतरप्रधान नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण केवळ केंद्र सरकारपर्यंत मर्यादित नसून त्यात राज्यांचा सहभाग व विकास विचारात घेऊन विकेंद्रीत झाल्याचे दिसून येते.

● **संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि तुलनात्मक या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

● **पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण:-**

२०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी यांचे बहुमत असणारे सरकार सत्तेत आले. २०१४ ते २०१९ या पाच वर्षात मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा विकास हा प्रामुख्याने पाच टप्प्यात झाल्याचे दिसून येते. "पहिला टप्पा आहे दक्षिण

आशियाचा भारताला आपल्या सात शेजारी राष्ट्रांशी ज्यांना सार्क कंट्रीज असे म्हटले जाते त्यांच्याशी आपले संबंध घनिष्ठ करायचे आहेत. मोदी यांनी त्यांच्या निवडणूक प्रचारात दक्षिण आशियातील विकासाचा आणि गरिबीचा प्रश्न हे दोन प्रश्न उचलून धरले होते. आपण दक्षिण आशियावर भर का देतो? कारण भारताचा आर्थिक विकास आणि भारताची अंतर्गत सुरक्षा ही भारताच्या शेजारील राष्ट्रांमधील शांतता, तेथील लोकशाहीचे अस्तित्व, राजकीय स्थैर्य व त्यांच्या आर्थिक विकासाशी निगडित आहे. या राष्ट्रांमध्ये लोकशाही नांदली, शांतता प्रस्थापित झाली, त्यांचा विकास झाला तर भारतात शांतता आणि स्थैर्य निर्माण होईल. कारण भारताच्या सीमा या राष्ट्रांना जोडलेल्या आहेत. त्यामुळे या राष्ट्रांबरोबर आर्थिक विकास सुधारणे, या राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये योगदान देणे हे आता भारताने आपले प्रमुख आर्थिक उद्दिष्ट ठरवले आहे. शेजारी राष्ट्रांबरोबर आर्थिक संबंध घनिष्ठ करण्यासाठी मोदी यांनी प्रथम भूतान आणि नंतर नेपाळ या राष्ट्रांची भेटीसाठी निवड केली. हे त्यांचे पहिले वर्तुळ आहे. यानंतर त्यांनी दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रे आणि उत्तर पूर्व आशियाई राष्ट्रांशी संबंध विकसित करण्याचे ठरवले आहे. यासाठीच तत्कालीन परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज या म्यानमार आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर गेल्या होत्या. दुसरीकडे तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे व्हिएतनाम दौऱ्यावर जाऊन आले. स्वतः नरेंद्र मोदी हे जपानच्या दौऱ्यावर गेले होते हा दुसरा टप्पा झाला."[01] तिसरा टप्पा हा युरोप आणि महासत्तांशी संबंध घनिष्ठ करणे हा होता. त्या दृष्टिकोनातून ही महत्त्वपूर्ण पावले पडली आहेत. युरोपमध्ये मॅन्युफॅक्चर

इंडस्ट्रीचा विकास खूप मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. जर्मनीमध्ये ऑटोमोबाईल इंडस्ट्रीचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. त्यामुळे युरोपकडून भारताला फार मोठ्या अपेक्षा आहेत. नरेंद्र मोदी यांनी फ्रान्स, जर्मनी आणि कॅनडा या युरोपियन देशांचा दौरा पूर्ण केला आहे. 'मेक इन इंडिया' 'क्लीन इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' या महत्त्वकांक्षी प्रकल्पांच्या दृष्टीने युरोप हा भारतासाठी महत्वाचा आहे. मोदी यांच्या दौऱ्यामध्ये युरोपमधील परदेशी गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

चौथा टप्पा हा अमेरिकेबरोबरील संबंधाचा आहे. मोदी शासनाच्या काळात भारताचे अमेरिकेबरोबरचे संबंध अत्यंत घनिष्ठ झाले आहेत. यूपीए सरकारच्या काळात नागरी अणुकरार झाला पण त्याची अंमलबजावणी झाली नाही हा करार मोदींच्या काळात पूर्णत्वास गेला. त्याचप्रमाणे संवेदनशील तंत्रज्ञान भारताला मिळायला सुरुवात झाली. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या घनिष्ठ संबंधामुळे जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांनीही भारतासोबत महत्त्वपूर्ण अणुकरार केले. अमेरिकेच्या समर्थनामुळे चीनविरोधातील आपली शक्ती वृद्धिंगत करण्यात आपल्याला यश आले आहे. अमेरिकेबरोबरच्या घनिष्ठ संबंधांमुळे प्रथमच हिंदी महासागराची आणि आशिया प्रशांत महासागराची सुरक्षा परस्परांना जोडली गेली. डोनाल्ड ट्रम्प यांनी जी नवी सुरक्षा रणनीती घोषित केली त्यामध्ये त्यांनी भारताने आशिया प्रशांत क्षेत्रात मोठी भूमिका निभावावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्याचप्रमाणे त्यांनी अफगाणिस्तान पाकिस्तान धोरण घोषित केले

होते त्यातही अशाच प्रकारची अपेक्षा व्यक्त केल्या गेले होती. भविष्यात अमेरिका आणि भारत यांच्यातील परस्पर संबंध अत्यंत ताकतीचे होणार आहेत. पाचवा टप्पा हा आफ्रिकेबरोबरील संबंधाचा येतो मोदी सरकारने सत्तेत आल्यानंतर आफ्रिकेकडे अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली. हिंदी महासागराजवळील सेशल आणि मॉरिशस या दोन आफ्रिकी देशांना मोदींनी भेटी दिली. हिंदी महासागरातील बेटांची भेट आणि सागरी सुरक्षा यासाठी हे दौरे होते. त्यानंतर राष्ट्रपती उपराष्ट्रपती यांनीही आफ्रिकन देशांना भेटी दिल्या आहेत. २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिण आफ्रिका, मोझाम्बिक, टांझानिया आणि केनिया या चार देशांना भेटी दिल्या. एनर्जी डिप्लोमसी (उर्जा राजनय) आणि ब्ल्यू इकॉनॉमिक डिप्लोमसी या दोन गोष्टींच्या आधारावरती या दौऱ्याची आखणी करण्यात आली होती. हा दौरा अनेक अर्थाने ऐतिहासिक दौरा ठरला. भारताचा आफ्रिकेबरोबरचा व्यापार ७० अब्ज डॉलर्स इतका आहे भारताने आफ्रिकेत ४०अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. गुंतवणूक आणि व्यापार या दोन्हीही बाबतीत चीनच्या तुलनेत भारत खूप मागे आहे. वास्तविक आफ्रिकेसोबत मोठ्या प्रमाणावर व्यापार वाढवण्याची संधी भारताला आहे आणि ही संधी साधण्यासाठी मोदी सरकारने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू केले आहेत. ऑक्टोबर २०१५ मध्ये नवी दिल्ली येथे तिसऱ्या भारत-आफ्रिका शिखर संमेलनात सर्वच्या सर्व ५४ आफ्रिकी देशांचे प्रतिनिधी आले होते. मागील काळात भारताच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या विश्वासतुटीचा फायदा चिनने घेतला

होता. या पार्श्वभूमीवर या दौऱ्यामधून पंतप्रधान मोदींनी विश्वास निर्मितीला बळकटी देण्याचा प्रयत्न केला आहे.

नरेंद्र मोदी यांच्या या सर्व समावेशक परराष्ट्र धोरणातील महत्वाच्या बाबी पुढील प्रमाणे आहेत.

● **आर्थिक विकासाला प्राधान्य:**

नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक विकासाला प्राधान्य दिले आहे. मोदींसमोर जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि चीन या चार देशांचे मॉडेल्स आहेत. या चार देशांनी आपला विकास अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने पूर्ण केला आहे. या देशांच्या आर्थिक विकासाचे रहस्य त्यांच्या उत्पादनाच्या निर्यातीमध्ये आहे. यातील दक्षिण कोरियाचा विचार केला तर त्यांच्या अर्थव्यवस्थेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग गुड्सचा वाटा तब्बल ८६ टक्के आहे. चीनमध्ये तो ५५ टक्के आहे आणि जपानमध्ये ६० टक्के आहे. म्हणून हे देश प्रचंड निर्यात करतात. त्यामुळे त्यांना प्रचंड परकीय चलन मिळते. भारतात मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजचा वाटा फक्त २३ टक्के आहे. त्यामुळे भारतातून निर्यात फार मोठ्या प्रमाणावर होत नाही. भारतात सेवा क्षेत्राचा अर्थव्यवस्थेमधील वाटा ५२ टक्के आहे परंतु या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण केवळ तीन टक्के आहे. याचाच अर्थ असा होतो की सेवा क्षेत्रात रोजगार निर्मिती मर्यादित आहे. पण मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण सध्या २६ टक्के आहे हे वाढवता येऊ शकते. म्हणजेच उत्पादन निर्मितीच्या क्षेत्रात रोजगार निर्मितीचे प्रचंड सामर्थ्य

आहे आणि मोदी यांना तूर्तास दोन कोटी भारतीयांसाठी रोजगार निर्मिती करायची आहे यासाठीच त्यांनी उत्पादन निर्मितीच्या क्षेत्रावर भर देण्यास सुरुवात केली आहे.

**● परदेशी गुंतवणुकीला आकर्षित करण्याचा प्रयत्न**

"याचा परराष्ट्र धोरणाशी संबंध कसा आहे? तर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या विकासासाठी साधन संपत्तीचा म्हणजे रेल्वे, रस्ते पूल, यांचा विकास होणे आवश्यक आहे आणि यासाठी परकीय गुंतवणुकीची आवश्यकता आहे. कारण आपल्याकडे त्यासाठीची भांडवल उपलब्धता नाही. दक्षिण कोरिया आणि चीनने सुरुवातीच्या काळात अशाच प्रकारे परकीय गुंतवणूक आकर्षित केली आणि त्यानंतर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीचा मोठ्या प्रमाणावर विकास केला. त्यामुळेच भारतातील साधन संपत्तीच्या विकासासाठी परकीय गुंतवणूक आकर्षित करणे हे मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट आहे. यातून उत्पादन क्षेत्राचा विकास आणि रोजगार निर्मिती ही दोन्हीही उद्दिष्टे साधली जाणार आहेत. रस्ते बांधणी, रेल्वे वाहतूक, पूल उभारणे या कामांमधून अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यातून बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळेच ते परराष्ट्र धोरणाचा वापर विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी करत आहेत. त्यांचा मूळ उद्देश मॅनुफॅक्चरिंग इंडस्ट्री वाढवणे हा आहे. त्यासाठी त्यांनी 'मेक इन इंडिया' नामक प्रोजेक्ट हाती घेतला आहे. भारतात गुंतवणूक करणाऱ्यांच्या जमीन, वीज आणि पर्यावरणासंबंधीचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे या तीन प्रमुख

मागण्या असतात. शासन या तीनही गोष्टी देण्यासाठी वेगाने प्रयत्न करण्यास तयार आहे. या तीन गोष्टी मिळाल्यानंतर परकीय गुंतवणूकदारांकडून भारतामध्ये उत्पादन केले जाईल, त्यावर भारताचे ब्रॅण्डिंग असेल आणि त्या वस्तू निर्यात केल्या जातील असे यामागचे उद्दिष्ट आहे."[02]

**● परदेशी भांडवल व तंत्रज्ञानावर भर :**

सध्या भारत हा आयातदार देश आहे. भारताची निर्यात खूप कमी आहे. त्यामुळे आपल्याकडे व्यापारी आणि वित्तीय तूट मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहे. ही कमी करण्यासाठी व अर्थव्यवस्थेची पत वाढवण्यासाठी परकीय गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. यातून ऊर्जा निर्मिती व निर्यात वाढेल. मोदी यांना परदेशातून भांडवल आणि तंत्रज्ञान हवे आहे. मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या या दोन गोष्टी भारताकडे नाहीत. त्यामुळेच मोदी हे तंत्रज्ञानाची मागणी चीन, जपान आणि अमेरिका आदी देशांकडे करत आहेत. भारताला आगामी पाच वर्षांमध्ये मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या विकासासाठी ५०० अब्ज डॉलरची गरज आहे त्यापैकी त्यांनी ३५ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीचे आश्वासन जपानकडून, २०अब्ज डॉलरचे आश्वासन चीनकडून आणि ५० अब्ज डॉलरचे आश्वासन अमेरिकेकडून मिळवले आहे. त्याचबरोबर अमेरिकन भांडवलदारांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी आवाहन केले आहे. यासाठी त्यांनी जमीन, वीज आणि पर्यावरणीय सूट देण्याबरोबरच देशांतर्गत कामगार कायद्यांमध्ये आणि कररचनेमध्ये बदल करून त्यातील क्लिष्टता दूर करण्याचे

ठरवले आहे. तसेच उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व ना-हरकत दाखले ७२ तासांमध्ये मिळवून दिले जातील असे आश्वासन प्रत्येक परदेशी गुंतवणूकदारांना दिले आहे. परदेशी गुंतवणुकीच्या आड येणारे जुने कायदे रद्द करण्यासही त्यांनी प्रारंभ केला आहे. हे सगळे मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या विकासासाठी केले जात आहे.

**● आरोग्य क्षेत्रावर भर:-**

याचबरोबर मोदी यांनी आरोग्य क्षेत्रावर भर देण्यास सुरुवात केली आहे. या मागचे कारण म्हणजे भारतात सध्या ३० कोटी म्हणजे एक चतुर्थांश नागरिक हे कायमस्वरूपी आजारी आहेत. त्यामुळे आपल्याकडील कामगारक्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे आरोग्य सुधारण्यासाठी मोदी यांनी शौचालय उभारण्यापासून ते स्वच्छता मोहिमेपर्यंत सर्व बाबी हाती घेतल्या आहेत. कारण आरोग्य सुधारले की क्रिएटिव्हिटी व उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते. थोडक्यात गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये मोदी यांनी परराष्ट्र धोरणाचा वापर हा परकीय भांडवल भारताच्या आरोग्य क्षेत्रात आणण्यासाठी सुरुवात केली व यासाठी देशांतर्गत कायदे बदलण्याचे धोरणही स्वीकारले.

**● राष्ट्रीय सुरक्षा व हितसंबंधांचे रक्षण :**

मोदी यांनी परराष्ट्र धोरणाबाबत काही लक्ष्मणरेषा आखण्यास किंवा चौकट तयार करण्यास सुरुवात केली आहे. या लक्ष्मणरेषांचा उद्देश भारताच्या राष्ट्रीय

सुरक्षेशी निगडित हितसंबंधांचे रक्षण करण्याचा आहे. याचाच अर्थ पाकिस्तान किंवा चीनबरोबर सहकार्य वाढवण्यासाठी भारताच्या सुरक्षेचा बळी दिला जाणार नाही, हे मोदींनी स्पष्ट केले आहे. यासाठी पाकिस्तानचे उदाहरण घेता येईल. पाकिस्तानला त्यांनी स्पष्टपणे सांगितले की आम्ही तुमच्याशी बोलणी करू पण त्यासाठी आमचे काही नियम आहेत. तुम्ही हुरीयतशी चर्चा करणारा असाल तर आम्ही तुमच्याशी चर्चा करणार नाही. तसेच तुम्ही गोळीबार केला तर आम्हीही करु. अशाच प्रकारे त्यांनी चीनलाही सांगितले आहे की आम्ही तुमच्याशी इतर मुद्द्यांवर सहकार्य करू, चर्चा करू पण ते करत असताना आम्ही सीमेवर साधन संपत्तीचा विकास करू. त्याचप्रमाणे त्यांनी अमेरिकेलाही अशा लक्ष्मणरेषा आखून दिल्या आहेत. त्यानुसार भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध कितीही सुधारले तरी अमेरिकेची प्रत्येक गोष्ट भारत स्वीकारणार नाही. जसे चीन व तैवान यांच्यातील संघर्षाविषयी, इराण किंवा सीरियाच्या प्रश्नाविषयी भारताची आपली स्वतंत्र व अमेरिकेच्या विरोधात जाणारी भूमिका आहे. तसेच आम्ही आमचे शांती सैनिक तुम्ही म्हणाल तिथे पाठवणार नाही. आम्ही चीनला उघडपणे विरोध करणार नाही असे मोदी यांनी अमेरिकेलाही सांगितले आहे. थोडक्यात परराष्ट्र धोरणासाठी मोदी यांनी लक्ष्मणरेषांच्या चौकटीमध्ये परराष्ट्र धोरण बसवले आहे या धोरणाचे शेवटचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आर्थिक विकास आणि संरक्षण सिद्धता या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधण्याचे ठरवले आहे. एकूणच पंडित नेहरूंची मूलभूत आर्थिक सुधारणांवर भर देणारी जी सर्वसमावेशक परराष्ट्र धोरणाची योजना होती त्याचे प्रतिबिंब, इंद्रकुमार गुजराल यांच्या दक्षिण

आशियाई राष्ट्रांशी प्रथम संबंध कनिष्ठ करण्याची भूमिका होती त्याचे प्रतिबिंब आणि विकसित राष्ट्रांची संबंध घनिष्ठ करण्याची अटल बिहारी वाजपेयी यांची जी भूमिका होती याचे प्रतिबिंब मोदी यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये पडल्याचे दिसते.

**● नरेंद्र मोदींचे पाकिस्तान बाबतचे धोरण**

नरेंद्र मोदी यांच्या पाकिस्तान बाबतच्या धोरणाची तीन प्रमुख वैशिष्ट्य आहेत जी पूर्वीच्या सरकार पेक्षा वेगळे आहेत.

१) सिमला करार आणि लाहोर करार यामध्ये काश्मीर प्रश्न हा द्विपक्षीय प्रश्न मांडला गेला आहे त्यामुळे या मुद्द्यांबाबत भारत पाकिस्तानची द्विपक्षीय चर्चेसाठी तयार असेल. तिसऱ्या कोणालाही यामध्ये समावेश घेण्यास भारत नकार देईल.

२) "पाकिस्तान काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय प्रश्न बनवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत हा मुद्दा उपस्थित केला. पण भारत ही बाब गांभीर्याने घेणार नाही."[03] त्यामुळेच नरेंद्र मोदी यांनी न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेमध्ये पाकिस्तानच्या टीकेला उत्तर देणे टाळले.

३) आजवर पाकिस्तान कडून सीमेवर गोळीबार केला जात होता; पण भारताकडून त्याला प्रत्युत्तर दिले जात नव्हते. याचे कारण सीमेवर तणाव वाढेल आणि

त्याचे अण्वस्त्रयुद्धामध्ये रूपांतर होऊ शकेल, अशी भारताला भीती होती. परंतु मोदी यांच्या कार्यकाळात आता हे धोरण बदलून जशास तशी भूमिका स्वीकारली. म्हणजे पाकिस्तानने गोळीबार केला तर त्याला भारताने सडेतोड प्रतिउत्तर दिले. या तीन बदलांमुळे अणूयुद्धाच्या भीतीने भारताला सातत्याने ब्लॅकमेल करणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेची कोंडी झाली.

"या काळात पाकिस्तानचे नैराश्य वाढले. कारण मोदींनी पाकिस्तानकडे दुर्लक्ष करून जागतिक पातळीवर इतर राष्ट्रांशी संबंध सुधारण्याचा सपाटा लावला. तसेच चीनची भूमिका बदलण्यात ही ते यशस्वी ठरले. त्यामुळेच आजवर चीनचे राष्ट्राध्यक्ष भारतभेटीवर आल्यानंतर इथून ते पाकिस्तानला जात असत पण शी झिनपिंग यांनी भारत भेटीनंतर पाकिस्तानला जाणे टाळून त्यांच्या भूमिकेतील बदल दाखवून दिला. त्यामुळे राजनैतिकदृष्ट्या विभागीय पातळीवर पाकिस्तानला अलिप्त करण्यात व वेगळे पाडण्यात मोदींचे परराष्ट्र धोरण यशस्वी असे सद्या दिसत आहे."[04]

अशा प्रकारे विविधांगी स्वरूपात भारतीय परराष्ट्र धोरणाची मोदी-नीती दिसून येते.

**● निष्कर्ष (Conclusions)**

१) नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण मानवीय तत्त्वनिष्ठतेपेक्षा वास्तविकतेला प्राधान्य देणारे असल्याचे दिसून येते.

२) केवळ सामरिक आणि भुराजनैतिक बाबींपुरते मर्यादित न राहता; आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक बाबतीत सक्रिय पुढाकार घेणारे नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण असल्याचे लक्षात येते.

३) नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणातून शेजारी राष्ट्रांनाही अनुकूल असे प्रादेशिक मॉडेल भारताच्या नेतृत्वात उदयाला येत असल्याचे दिसते.

● **संदर्भ ग्रंथ (References) :**


1) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१७, पृष्ठ क्रमांक - १८

2) कित्ता, पृष्ठ क्रमांक-१९

3) कित्ता, पृष्ठ क्रमांक-२०

4) कित्ता, पृष्ठ क्रमांक-२१

5) अनय जोगळेकर, भारताच्या परराष्ट्र धोरणाची विस्तारणारी क्षितिजे, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०१९